निविदा सुचना क्र.01 / 2025–26

**www.Chhatrapatisambhajinagarzp. maharashtra.gov.in**

## जिल्हा परिषद छ. संभाजीनगर यांच्या मालकीच्या मोकळया जागेवर गणेशमुर्ती विक्री करिता तात्पुरत्या स्वरूपात जागा भाडयाने देणे बाबत.

जिल्हा परिषद बांधकाम विभाग छ. संभाजीनगर अंतर्गत जिल्हा परिषद कार्यालयाच्या पाठीमागील औरंगपुरा येथील मोकळी जागा भाडेतत्वावर गणेशमुर्ती विक्री करिता दरपत्रके कार्यकारी अभियंता (बांध) जिल्हा परिषद छ. संभाजीनगर हे योग्य त्या एजन्सी / व्यक्ती / बचतगट यांचे कडून मागविण्यात येत आहेत.

दरपत्रके दि. 25.07.2025 रोजी सांय 17:00 वाजेपासुन ते दि. 04.08.2025 रोजी सांय 17.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. आणि निविदा दि. 04.08.2025(17:30) रोजी उघडण्यात येतील. अधिक माहिती जिल्हा परिषद छ. संभाजीनगर या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निविदामध्ये कोणतेही दर अथवा कोणतेही निविदा (सर्व निविदा) स्विकारण्याचा अथवा त्यातील कोणतेही कारण न दाखवता नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिका–यांकडे राखुन ठेवला आहे. दरपत्रके कार्यकारी अभियंता(बांध), जि.प.छ. संभाजीनगर कार्यालयात सादर करावेत.

Sd/-

कार्यकारी अभियंता (बांध)
जिल्हा परिषद छ. संभाजीनगर

# जिल्हा परिषद छ. संभाजीनगर यांच्या मालकीच्या मोकळया जागेवर गणेशमुर्ती विक्री करिता तात्पुरत्या स्वरूपात जागा भाडयाने देणे बाबत.

## बांधकाम विभाग

दुरध्वनी. (0240) 2331571–76 फॅक्स. (0240) 2335573
email- addlceozoabd@gmail.com / zpworksaurangabad@gmail.com

**निविदा नोटीस क 01 जिपऔ / बांध / निविदा / 2025–2026 /**

जिल्हा परिषद (बांधकाम) छ. संभाजीनगर अंतर्गत खाली नमुद केलेल्या जि.प.च्या मालकीच्या मोकळया जागेवर गणेश मुर्ती विकि करिता सदरील जागा तात्पुत्या स्वरूपात भाडयाने देण्याकरिता योग्य त्या नोंदणीकृत संस्था, क्लब इ. कडुन दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ. क. | कामाचे नाव | करारनामा कालवधी | अपेक्षित जागेचे भाडे कमीत कमी | बयाना / सुरक्षा रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा परिषद छ.संभाजीनगर यांच्या मालकिच्या मोकळया जागेवर गणेश मुर्ती विक्री करिता दिनांक 14.08.2025 ते दिनांक 27.08.2025 (किमान 14 दिवस) पर्यत या कालावधी साठी तात्पुरत्या स्वरूपात जागा भाडयाने देणे | किमान 14 दिवस | 1,51,000/- (एक लक्ष एक्कावन मात्र) | रू. 35000/- दरपत्रका सोबत द्यावयाचा डी.डी. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद छ. संभाजीनगर यांचे नावे |

## निविदा माहिती व अटी / शर्ती

1 निविदाधारक हा नोंदणीकृत संस्था, क्लब, बचतगट ई. पैकी असावा.त्याबाबतच्या प्रत दरपत्रकासोबत सादर करावे.

2 सदर मैदान दि. 14.08.2025 ते दि. 27.08.2025 या कालावधीत तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देण्यात येते आहे.

3 निविदाप्रणाली अंतर्गत विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास त्या निविदाकारांच्या निविदा स्विकारल्या जाणार नाहींत व जे कंत्राटदार निविदा प्रकीयेमध्ये अपात्र ठरतील, त्यांनी भरलेली इसारा रक्कम संबंधिताचे खात्यामध्ये निविदा प्रकीया पूर्ण झाल्या नंतर परत होईल.

4 निविदा धारकांनी कागद पत्राच्या नोंदणी प्रमाणपत्र या सर्व कागद पत्रांची सत्यता पडताळुनच आपल्या जबाबदारीवर सादर करावे. यामध्ये खोटे अथवा दिशाभुल करणारे कागदपत्रे आढळल्यास संबधिताचे नाव शासनाचे काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल व भविष्यात निविदा भरण्यासाठी प्रतिबंध लावण्यात येईल

5 कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा त्यातील कोणतेही कारण न दाखवता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.

6 जि.प. बांधकाम विभाग औरंगाबाद येथे जागेचे निश्चित होणारे भाडे आगाउ भरावे लागेल.तसेच, रू. 35000/– इतकी अनामत म्हणून भरावी लागेल. जागेचा वापर संपल्यावर सदर जागा स्वच्छ करून देणेची जबाबदारी भाडे वसुली कंत्राटदारांची राहील. याची पुर्तता न केल्यास अनामत रक्कम जप्त केली जाईल.

7 सदर जागेवर वहीवाट राहणार नाही. तसेच जागेवर कोणाचा कोणताही हक्क राहणार नाही.

8 गणेशमुर्ती विक्री मुळे जागेवर खराबी होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल याची सर्वस्व जबाबदारी निविदा धारकाची राहील.जागा आहे. त्या स्थितीत भाडयाने देण्यात येईल. आवश्यक साफसफाई करून ताब्यात घेण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील

9 सदर जागा आपली मुदत संपेलत्या रोजी सायंकाळी रिक्त व स्वच्छ करून जिल्हा परिषदेच्या ताब्यात द्यावी लागेल. अन्यथा साफसफाईचे निविदा व्यतिरिक्त जास्तीचे रू. 35000/– शुल्क भरावे लागेल.

10 दुकानासाठी, साठयासाठी व विक्रीसाठी आवश्यक परवानगी जिल्हाधिकारी/पोलिस/ आयुक्त/अग्नीशमन विभाग/महानगरपालिका/अन्य तत्सम कार्यालय यांचेकडून नाहरकत/परवानगी घेण्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकाची राहील त्यासाठी लागणारा खर्च/यंत्रणा भाडे वसुली कंत्राटदारोनीच करावयाचा आहे. महापालिका वा इतर यंत्रणांचे कर हे कंत्राटदारांनीच भरावयाचे आहेत त्याशिवाय जागा हस्तांतरित केली जाणार नाही.

11 या व्यतिरिक्त कुठल्याही स्थानिक अडचणी आल्यास त्या सोडविण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

12 कोविड–19 मुळे उध्दभलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता प्रत्येक दुकानाचे अंतर हे 5 फुटाचे असणे बंधनकारक राहील. दुकानामध्ये थर्मल स्किनिंग बाबतव्यवस्था करणे आवश्यक आहे. ग्राहकासाठी शारिरीक अंतराचे (फिजिकल डिस्टन्सींग) तसेचे स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनीआयझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

13 दुकानाच्या जागेत अग्नि व इतर नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील

14 निविदेत दिलेले एकूण दिवस कमी/जास्त होवू शकतात

15 भाडे वसुली कंत्राटदारांस जास्तीत जास्त रू. 1.00 प्रती स्क्वे.फु. प्रती दिन प्रमाणे भाडे वसुलीची मुभा राहील, त्यापेक्षा अधिक दराने वसुली केल्याचे निदर्षनास आल्यास कंत्राटदरांवर योग्य ती दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

१६ एखादे कागद पत्र अपुर्ण राहील्यास निविदे बाबत हक्क सांगता येणार नाही. तो सर्व अधिकार जिल्हा परिषद यांच्याकडे राखीव राहील.

१७ निविदा स्विकारण्याचा अथवा फैटाळण्याचा पुर्ण अधिकार जिल्हा परिषद छ. संभाजीनगर यांना राहील या बाबत. निविदाधारक/ कन्त्राटदारास कोणतीही लेखी सुचना देण्यात योणार नाही.

१८ एकूण दुकानगाळे पैकी १० दुकानगाळे महिला बचत गटाकरिता राखीव ठेवावे.

१९ सादर केलेली कागदपत्रे कोणत्याही टप्प्यावर खोटी आढळल्यास संबंधीतास दिलेले परवानगी तात्काळ रद्द समजण्यात येईल व निविदाधारक/कंत्राटदारवर कार्यवाही करण्यात येईल.

२० निविदा कामाचे आवश्यक दस्त Offline पध्दतीने मागवीण्याचे खात्याचे अधिकार सुरक्षित ठेवण्यात येत आहे.

२१ जिल्हा परिष्द छ. संभाजीनगर इमारतीचे बांधकाम चालु असल्याने सदर कामत अडथळा निर्माण होणार नाही या पद्धतीने दुकानांची आखणी करावी.

२२ दरपत्रक अंतिम झाल्यानंतर उच्चत्तम बोलीदारास कळविण्यात येईल. कळविण्यात आल्यानंतर उच्चतम बोलीदाराने सत्वरतेने मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद छ. संभाजीनगर यांच्या नावाने बोलीची रक्कम (बयाना रक्कम सोडून) जमा केल्यानंतर व बोलीदारास आदेश देण्यात येतील.

| कार्यकारी अभियंता(बांध)<br>जि. प. छ.संभाजीनगर | स्वा. / –<br>मुख्य लेखा व वित्तअधिकारी<br>जिल्हा परिषद छ.संभाजीनगर | स्वा. / –<br>अति.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद छ.संभाजीनगर |
|---|---|---|

<u>जिल्हा परिषद छ. संभाजीनगर मैदानावर गणेशमुर्ती विक्री करणे करिता मैदान भाडेतत्वावर देणे बाबत.</u>

जिल्हा परिषद औरंगाबाद येथील मालकीच्या मोकळया जागेवर गणेशउत्सव निमित्त गणेशमुर्ती विक्री करणे करिता मैदान भाडेतत्वावर देणेकरिता (दि. 14.08.2025 ते 27.08.2025 या कालावधी दरम्यान) आहे. करिता, ऐजन्सीकडून देय भाडे ठरविणेसाठी दरपत्रक मागवण्यात येत आहेत.

| कामाचे नाव | दरपत्रक सादर करण्याची मुदत | दरपत्रकासह अनामत रक्कम व इतर कागदपत्र |
|---|---|---|
| गणेशमुर्ती विक्री करणे करिता जि.प.छ. संभाजीनगर मैदान भाडेतत्वावर देणे बाबत. | दि. 25.07.2025<br>ते<br>दि. 04.08.2025 दुपारी 5.00 वाजे पर्यंत | 1 रू. 35000/- चा धनाकर्ष (Demand Draft)<br>नावे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद छ.संभाजीनगर<br>2 नोंदणीकृत संस्था(सहकार किंवा सेवाभावीसंस्था)/बचतगट पुरावा प्रत.<br>3 स्टॅप पेपरवर शपथपत्र सादर करणे. |

कार्यकारी अभियंता(बांधकाम)
जिल्हा परिषद छ.संभाजीनगर

मुख्यलेखा व वित्तअधिकारी
जिल्हा परिषद छ.संभाजीनगर

अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद छ.संभाजीनगर

## जिल्हा परिषद छ. संभाजीनगर मैदानावर विक्री करणारे यांचेकडून भाडे वसुली करणे करिता दरपत्रक नमुना 2025–2026.

| कामाचे नाव | निविदाधारकाचे दर | अक्षरी दर |
|---|---|---|
| गणेशमुर्ती विक्री करणे करिता जि.प. मैदान भाडेतत्वावर देणे बाबत. | | |

निविदाधारकाचे नाव व दिनाकिंत स्वाक्षरी

# 'शपथपत्र'

(निविदाधारकाने रू. 500/- चे मुद्रांकावर नोटरी करून सादर करावे.)

मी/ आम्ही खालीलप्रमाणे शपथपत्र सादर करीत आहे की,

1 जि.प. मागील मैदान गणेश मुर्ती विक्रि करिता तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर घेणे बाबत. या कामाची दरपत्रक भरणा करित आहे.
2 सदर निविदेतील सर्व अटि व शर्ती आम्हास मान्य आहे. (अनु.क्रं. 1 ते )
3 जि.प. बांधकाम विभाग छ. संभाजीनगर येथे जागेचे निश्चित होणारे भाडे आगाउ भरण्यास आम्हास मान्य आहे.
4 सदर जागेवर आमची कसलीही वहीवाट राहणार तसेच जागेवर आमचा कोणताच हक्क राहणार नाही.
5 गणेशमुर्ती विक्री मुळे जागेवर खराबी होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील.तसेच काही खराबी झाल्यास रू. 35000/-अनामत रक्कम जप्त केले जातील.
6 दुकानासाठी, साठयासाठी व विक्रीसाठी आवश्यक परवानगी जिल्हाधिकारी/ पोलिस/आयुक्त/अग्नीशमन विभाग/महापालिका वा अन्य तत्सम कार्यालय यांचेकडून नाहरकत/परवानगी घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील व सर्व बाबीची पुर्तता करावी लागेल त्याशिवाय जागा हस्तांतरित केली जाणार नाही. महापालिका किंवा इतर यंत्रणांचे कर आम्हीच भरणार आहोत.
7 या व्यतिरिक्त कुठल्याही स्थानिक अडचणी आल्यास त्या सोडविण्याची जबाबदारी आमची राहील.
8 दुकानाच्या जागेत अग्नि व इतर नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची जबाबदारी आमचीच राहील.
9 कोविड-19 मुळे उध्दभलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता ग्राहकासाठी शारिरीक अंतराचे (फिजिकल डिस्टन्सींग) तसेचे स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनीआयझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्याची जबाबदारी माझी राहील. दुकानाचे ठिकाणी गर्दी होणार नाही तसेच ध्वनी प्रदुषणा संदर्भातील नियमाचे व तरतुदीचे पालन करण्याची जबाबदारी माझी राहील.
10 भाडे वसुलीचे दर जास्तीत जास्त रू. 1.00 प्रती स्क्वे. फु. प्रतीदिन प्रमाणे राहतील. त्यापुक्षा अधिक दराने भाडे वसुली केली जाणार नाही. तशी बाब निदर्षनास आल्यास त्यास मी स्वतः जबाबदार राहिल.
11 आम्ही सादर केलेली माहिती ही पुर्ण सत्य आहे.

लिहून देणार

प्रति,

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद छ. संभाजीनगर